नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ३०/०१/२०२५ (गुरूवार)

---

### रात्रगस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक,हददपार आरोपी ,दारू बाळगणारे आरोपी, यांच्या वर गुन्हे नोंद.

पोलीस स्टेशन खापरखेडा :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत सिल्लेवाडा, चनकापुर खापरखेडा येथे दिनांक २९/०१/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ३०/०१/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. कोबींग ऑपरेशन हे उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान उपविभाग श्री संतोष गायकवाड यांचे नेतृत्वात करण्यात आले. कोबींग ऑपरेशन करीता पोलीस स्टेशन खापरखेडा चे पोलीस निरीक्षक श्री अरविंदकुमार कतलाम, पोउपनि आरती नरोटे सोबत पोलीस स्टेशन खापरखेडा येथील अधिकारी अंमलदार तसेच आरसीपी पथकाचे अंमलदार असे हजर होते. कोंबींग ऑपरेशन दरम्यान सिल्लेवाडा, चनकापुर ,खापरखेडा भागात पैदल पेट्रोलींग केली. तसेच त्या भागातील रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.सदर कोबींग दरम्यान खालील कारवाई करण्यात आली आहे.

१.आरोपी नामे हेमंत उर्फ सुदामा मधुकर चाफडहाके, रा वार्ड क्र २,खापरखेडा याला मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या आदेशाने नागपुर ग्रामीण आणि नागपुर शहर हददीतुन हददपार करण्यात आले होते परंतु तो शासनाची कोणतीही परवानगी न हददपार आदेशाचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्याने आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२. आरोपी प्रतिक लिलाधर चौरेवार्ड क्र ०६ सिल्लेवाडा सावनेर ,खापरखेडा याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याचे घरातुन १२ सिलबंद देशी दारू ने भरलेल्या निपा प्रत्येकी १८० एम एल किमती प्रत्येकी ७० रू प्रमाणे १०५०/रू चा मुददेमाल जप्त करण्यात आाला असुन आरोपीवर ६५ ई म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्धी साठी घेण्यात आली कार्यशाळा

**काटोल:—** भारतीय न्याय संहिता—२०२३,भारतीय नागरीकसुरक्षासंहिता—२०२३,भारतीय साक्ष अधिनियम—२०२३ तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्धी साठी दिनांक ३०/०१/२५ रोजी नबिरा महाविदयालय,काटोल येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.

सदर कार्यशाळेत मा.श्री.एम.झेड.ऐ.ऐ कुरेशी,प्रथमवर्ग न्यायधीश, काटोल न्यायालय,मा.श्री.जे.जे. ईनामदार,प्रथमवर्ग न्यायधीश ,काटोल न्यायालय, श्री अमरदीप चवरे,शासकीय अभियोक्ता काटोल न्यायालय, श्री दिपक केने, अध्यक्ष काटोल वकील संघ, श्री. सागर देशमुख,शासकीय अभियोक्ता काटोल न्यायालय, श्रीमती अनुजा तेलंग,शासकीय अभियोक्ता काटोल न्यायालय,श्रीमती निलांबरी बागडे,विधी अधिकारी,उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय काटोल विभाग, श्री.नविन सर,प्राचार्य नबिरा महाविदयालय, काटोल.यांनी भारतीय न्याय संहिता—२०२३,भारतीय नागरीक सुरक्षा संहिता—२०२३, भारतीय साक्ष अधिनियम—२०२३ या तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्धी साठी आयोजित कार्यशाळेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपरोक्त विषयाच्या अनुशंगाने एकुण तीन सत्रात कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत. सदरकार्य शाळेत पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक, व महाविदयालयीन विद्याथी/विद्यार्थीनी, जेष्ठनागरीक, अंगणवाडी सेवीका, शिक्षक हजर होते.मा.श्री.हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री रमेश धुमाळ,अप्पर पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.

उपरोक्त तीनही सत्रात श्री बापू रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग,पोनि श्री निशांत मेश्राम पो.स्टे काटोल. सपोनि श्री राजकुमार त्रिपाठी पो.स्टे कोंढाळी हजर होते.

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**